# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महानगरपालीकेतील जे कर्मचारी LSGD/LGS परीक्षा उत्तीर्ण झालेले
**{सा.प्र. विभाग}** आहेत, मात्र त्यांना वेतनवाढीचा लाभ देण्यात आलेला नव्हता त्या कर्मचा-यांना सदर परिक्षा उत्तीर्ण झाल्याच्या पुढील महिन्याचे एक तारखेपासून ठराव क्रमांक ४३ दिनांक ०८-०२-२०२४ मध्ये नमूद प्रमाणे एक वेतनवाढ अनुज्ञेय करण्यात आली होती.

तसेच कार्यालयीन आस्थापना विभागाचे परिपत्रक क्रमांक ५५४/दिनांक २१-०२-२०२४ मध्ये नमूद केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने, अंमलबजावणी करतांना वेतननिश्चिती व थकबाकीबाबत विभागाकडून काही शंका उपस्थीत करण्यात आलेल्या होत्या. यास्तव परिपत्रकातील मुद्यावर स्पष्टीकरणात्मक खुलासा खालील प्रमाणे होणे आवश्यक आहे.

मुद्या क्र. १)एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा पुर्व परवानगी घेवून उत्तीर्ण असणाऱ्या/होणाऱ्या (यापुर्वीपरिक्षा उत्तीर्ण झालेले असतील तथापी लाभ अनुज्ञेयता बाबत सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त नसल्याने अमंल झाला नसेल अश्या प्रकरणांसह) नागपूर महानगरपालिकेत कार्यरत मनपा कर्मचारी यांना उक्त अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्यामुळे ही परिक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून नमूद सुधारीत धोरणाप्रमाणे फक्त एक आगाऊ वेतनवाढ संबंधीत अटी/ शर्तीच्या अधिन राहून देय राहील.

स्पष्टीकरण : दिनांक ०८/०२/२०२४ ला घेतलेल्या ठरावानंतर जे कर्मचारी LSGD/LGS परिक्षा पुर्व परवानगी घेऊन उत्तीर्ण होतील त्यांना परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुढील महिन्याचे एक तारखेपासून एक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

दिनांक ०८/०२/२०२४ ला घेतलेल्या ठरावापुर्वी जे कर्मचारी LSGD/LGS परिक्षा पुर्व परवानगी घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत, मात्र वेतनवाढीचा लाभ त्यांना अनुज्ञेय झालेला नव्हता अशा कर्मचा-यांना नविन धोरणानुसार परिक्षा उत्तीर्ण झाल्याच्या पुढील महिन्याचे १ तारखेपासून एका वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय होऊन त्यांचे वेतन सुधारीत होईल. सदर वेतन निश्चिती/ वेतन सुधारणेच्या अनुषंगाने संबंधीतास कुठलीही मागील थकबाकी मिळणार नाही. वेतन निश्चिती/ वेतन सुधारणेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष लाभ हा दिनांक १ जून २०२४ पासून अनुज्ञेय राहील.

उदा. "क्ष" कर्मचारी जुन २००५ ला एल.एस.जी.डी. परिक्षा पास झाला असून त्यांला १ जुलै २००५ पासून एक वेतनवाढ अनुज्ञेय होऊन वेतन निश्चिती होईल व वेतन निश्चितीच्या अनुषंगाने पुढील वेतनवाढी अनुज्ञेय होऊन सदर वेतन सुधारणेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष लाभ हा दि. १ जुन २०२४ पासून अनुज्ञेय राहील.

मुद्या क्र.२) यापूर्वी एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या मनपा कर्मचाऱ्यांना मनपा ठरावाचे अनुषंगाने (ठराव क्रमांक ८१, दिनांक २९-०६-१९९४)सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांचे मान्यतेने दोन वेतनवाढी देऊन वेतन निश्चिती केलेल्या वेतनाच्या आधारे झालेल्या प्रदानातुन कोणतीही वसुली करण्यात येऊ नये.

स्पष्टीकरण : दिनांक ०८/०२/२०२४ पुर्वी ज्या कर्मचा-यांनी LSGD/LGS परिक्षा पुर्व परवानगी घेऊन उत्तीर्ण केलेली आहे व त्यांना ठराव क्र. ८१, दिनांक २९/०६/१९९४ नुसार दोन

वेतनवाढी मा. आयुक्त यांचे मान्यतेने मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यांना त्याप्रमाणे वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्या सर्व कर्मचा-यांचे प्रकरणामध्ये पुन्हा वेतन निश्चिती व वसूली करण्यात येणार नाही.

मुद्या क्र.३) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमसी ३००६/२५२७/प्र.क्र. २६/ ०७/नवि २२दिनांक १५ मे २००८ मध्ये नमुद प्रमाणे, "स्थानिक स्वराज्य संस्थेतील दरवर्षी केवळ १ टक्के कर्मचा-यांना या प्रमाणे एक वेतनवाढ देय राहिल. अधिक कर्मचारी परिक्षेत बसून उत्तीर्ण झाल्याने हि वेतनवाढ सर्वात अधिक गुण मिळणा-या १ टक्के कर्मचा-यांना देय राहिल.

सदर वरील मुद्यातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत.

सर्व विभागांनी त्यांचे कडील कर्मचा-यांची प्रकरणे निकाली काढतांना सदर स्पष्टीकरणात्मक सूचना प्रमाणे कार्यवाही करावी.

वरिल प्रमाणे प्रस्तावास मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 112/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 30/12/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहाय्यक आयुक्त, समान्य प्रशासन विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महानगरपालीकेतील जे कर्मचारी LSGD/LGS परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत, मात्र त्यांना वेतनवाढीचा लाभ देण्यात आलेला नव्हता त्या कर्मचा-यांना सदर परिक्षा उत्तीर्ण झाल्याच्या पुढील महिन्याचे एक तारखेपासून ठराव क्रमांक ४३ दिनांक ०८-०२-२०२४ मध्ये नमूद प्रमाणे एक वेतनवाढ अनुज्ञेय करण्यात आली होती.

तसेच कार्यालयीन आस्थापना विभागाचे परिपत्रक क्रमांक ५५४/दिनांक २१-०२-२०२४ मध्ये नमूद केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने, अंमलबजावणी करतांना वेतननिश्चिती व थकबाकीबाबत विभागाकडून काही शंका उपस्थीत करण्यात आलेल्या होत्या. यास्तव परिपत्रकातील मुद्यावर स्पष्टीकरणात्मक खुलासा खालील प्रमाणे होणे आवश्यक आहे.

मुद्या क्र. १)एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा पुर्व परवानगी घेवून उत्तीर्ण असणाऱ्या/होणाऱ्या (यापुर्वीपरिक्षा उत्तीर्ण झालेले असतील तथापी लाभ अनुज्ञेयता बाबत सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांची मान्यता प्राप्त नसल्याने अमंल झाला नसेल अश्या प्रकरणांसह) नागपूर महानगरपालिकेत कार्यरत मनपा कर्मचारी यांना उक्त अभ्यासक्रम उत्तीर्ण केल्यामुळे ही परिक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून नमूद सुधारीत धोरणाप्रमाणे फक्त एक आगाऊ वेतनवाढ संबंधीत अटी/ शर्तीच्या अधिन राहून देय राहील.

स्पष्टीकरण : दिनांक ०८/०२/२०२४ ला घेतलेल्या ठरावानंतर जे कर्मचारी LSGD/LGS परिक्षा पुर्व परवानगी घेऊन उत्तीर्ण होतील त्यांना परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे पुढील महिन्याचे एक तारखेपासून एक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

दिनांक ०८/०२/२०२४ ला घेतलेल्या ठरावापुर्वी जे कर्मचारी LSGD/LGS परिक्षा पुर्व परवानगी घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत, मात्र वेतनवाढीचा लाभ त्यांना अनुज्ञेय झालेला नव्हता अशा कर्मचा-यांना नविन धोरणानुसार परिक्षा उत्तीर्ण झाल्याच्या पुढील महिन्याचे १ तारखेपासून एका वेतनवाढीचा लाभ अनुज्ञेय होऊन त्यांचे वेतन सुधारीत होईल. सदर वेतन निश्चिती/ वेतन सुधारणेच्या अनुषंगाने संबंधीतास कुठलीही मागील थकबाकी मिळणार नाही. वेतन निश्चिती/ वेतन सुधारणेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष लाभ हा दिनांक १ जून २०२४ पासून अनुज्ञेय राहील.

उदा. "क्ष" कर्मचारी जुन २००५ ला एल.एस.जी.डी. परिक्षा पास झाला असून त्यांला १ जुलै २००५ पासून एक वेतनवाढ अनुज्ञेय होऊन वेतन निश्चिती होईल व वेतन निश्चितीच्या अनुषंगाने पुढील वेतनवाढी अनुज्ञेय होऊन सदर वेतन सुधारणेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष लाभ हा दि. १ जुन २०२४ पासून अनुज्ञेय राहील.

मुद्दा क्र.२) यापूर्वी एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण केलेल्या मनपा कर्मचाऱ्यांना मनपा ठरावाचे अनुषंगाने (ठराव क्रमांक ८१, दिनांक २९-०६-१९९४)सक्षम प्राधिकारी मा. आयुक्त यांचे मान्यतेने दोन वेतनवाढी देऊन वेतन निश्चिती केलेल्या वेतनाच्या आधारे झालेल्या प्रदानातुन कोणतीही वसुली करण्यात येऊ नये.

स्पष्टीकरण : दिनांक ०८/०२/२०२४ पुर्वी ज्या कर्मचा-यांनी LSGD/LGS परिक्षा पुर्व परवानगी घेऊन उत्तीर्ण केलेली आहे व त्यांना ठराव क्र. ८१, दिनांक २९/०६/१९९४ नुसार दोन वेतनवाढी मा. आयुक्त यांचे मान्यतेने मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्यांना त्याप्रमाणे वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्या सर्व कर्मचा-यांचे प्रकरणामध्ये पुन्हा वेतन निश्चिती व वसूली करण्यात येणार नाही.

मुद्दा क्र.३) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पीएमसी ३००६/२५२७/प्र.क्र. २६/ ०७/नवि २२दिनांक १५ मे २००८ मध्ये नमुद प्रमाणे, "स्थानिक स्वराज्य संस्थेतील दरवर्षी केवळ १ टक्के कर्मचा-यांना या प्रमाणे एक वेतनवाढ देय राहिल. अधिक कर्मचारी परिक्षेत बसून उत्तीर्ण झाल्याने हि वेतनवाढ सर्वात अधिक गुण मिळणा-या १ टक्के कर्मचा-यांना देय राहिल.

सदर वरील मुद्यातील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत.

सर्व विभागांनी त्यांचे कडील कर्मचा-यांची प्रकरणे निकाली काढतांना सदर स्पष्टीकरणात्मक सूचना प्रमाणे कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.